नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

दैनिक
यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - ४ थे Year - 4rd	अंक - १५४ Issue - 154	वार - शुक्रवार दि. ३० ऑक्टोबर २०२६ Blow- Friday Date 30 OCTOBER 2026	ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com	पाने - ४ Pages - 4	किंमत - ४.०० रुपये Amout - 4 /- Rs	पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

राज्यातील २२ जिल्हा परिषद आणि उर्वरित पंचायत समित्यांच्या निवडणुकीचा मार्ग मोकळा

सर्वोच्च न्यायालयाचा मोठा निर्णय ; स्थानिक स्वराज्य संस्थांच्या प्रलंबित निवडणुकांना हिरवा कंदील

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

नवी दिल्ली : ओबीसी आरक्षणासह स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका घेऊ शकता, असा महत्त्वपूर्ण आदेश स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकांबद्दल सुप्रीम कोर्टाने दिला आहे. अंतरिम व्यवस्था म्हणून निवडणुका घेतल्या जाव्यात, ज्या निवडणुका अजून बाकी आहेत, त्याही घेतल्या जाऊ शकतात, असे सर्वोच्च न्यायालयाने म्हटलं आहे. त्या अंतिम निर्णयाच्या अधीन असतील, असेही कोर्टाने नमूद केले. त्यामुळे राज्यातील २० जिल्हा परिषदा आणि २११ पंचायत समित्यांच्या निवडणुकांचा मार्ग मोकळा झाला आहे.

सुप्रीम कोर्टाचे आदेश काय?

निवडणुका घेण्यासाठी आयोगाला पुरेसे मनुष्यबळ पुरवा असे राज्य सरकारला आम्ही आधीच सांगितलंय.

प्रलंबित निवडणुकांची अधिसूचना न काढण्याचं समर्थन होऊच शकत नाही.

आयोग आणि राज्य सरकारनं निवडणुका घेण्यासाठी आवश्यक त्या गोष्टी कराव्या आणि तसं आम्हाला सांगावं.

आम्ही टाकलेल्या अटी-शर्तीनुसार निवडणुका घेतल्या जाव्या.

वरिष्ठ वकील इंदिरा जयसिंग यांनी न्यायालच्या निदर्शनास आणून देताना सांगितले की, न्यायालयाच्या आदेशानुसार, १२ जिल्हा परिषदांमध्ये निवडणुका पार पडल्या आहेत. आता २० जिल्हा परिषदा आणि २११ पंचायत समित्यांच्या निवडणुका बाकी आहेत. तुम्ही अंतिम सुनावणीसाठी प्रकरण पुढे ढकलत आहात, परंतु 'ओबीसींसाठी किती टक्के आरक्षण असावे' हा मुख्य प्रश्न अजूनही निकाली निघायचा आहे. मी केवळ इतकीच विनंती करत आहे की, राज्य निवडणूक आयोगामार्फत यापूर्वी राबवल्या गेलेल्या प्रक्रियेप्रमाणेच उर्वरित निवडणुकाही पूर्ण केल्या जाव्यात. न्यायालयाच्या सध्याच्या आदेशांनुसार या निवडणुका सुरू राहू शकतात आणि त्यानंतर तुम्ही सुनावणीसाठी कोणतीही तारीख निश्चित करू शकता. ५० टक्क्यांच्या आरक्षणाचा मुद्दा या प्रकरणाच्या अंतिम निकालाच्या अधीन असेल.

लोकशाही प्रक्रिया का थांबवली जावी

यानंतर सरन्यायाधीश सूर्यकांत यांनी लोकशाही प्रक्रिया का थांबवली जावी अशी विचारणा केली. सॉलिसिटर जनरल यांनी कोणाला तरी यावर आक्षेप असू शकतो, असे नमूद करताच सरन्यायाधीश सूर्यकांत म्हणाले, आम्ही आधीच असा आदेश दिला आहे की, अंतरिम व्यवस्था म्हणून निवडणुका घेतल्या जाव्यात. ज्या निवडणुका अजून बाकी आहेत, त्याही घेतल्या जाऊ शकतात. मात्र, त्या अंतिम निर्णयाच्या अधीन असतील.

कोणत्या जि.प.निवडणुका प्रलंबित?

कोकण - पालघर, ठाणे

उ. महाराष्ट्र

नाशिक, धुळे, नंदुरबार, जळगाव, अहिल्यानगर

मराठवाडा

बीड, जालना, नांदेड, हिंगोली

विदर्भ

अमरावती, अकोला, वाशिम, बुलढाणा, यवतमाळ

नागपूर

वर्धा, भंडारा, गोंदिया, गडचिरोली, चंद्रपूर

मनमानीला चाप बसणार; स्वतंत्र टॅक्सी चालकांसाठी स्वतंत्र तंत्रज्ञान प्लॅटफॉर्म आणण्याचे मुख्यमंत्र्यांचे निर्देश

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

मुंबई: राज्यातील ॲप-आधारित प्रवासी वाहतूक क्षेत्रात स्वतंत्र टॅक्सी चालकांना न्याय मिळवून देण्यासाठी राज्य सरकारने आता कठोर पावले उचलली आहेत. ओला, उबर आणि इतर मोठ्या फ्लीट ऑपरेटर कंपन्यांच्या मनमानी कारभाराला आळा घालण्यासाठी आणि प्रवाशांच्या वाटपात पारदर्शकता आणण्यासाठी सर्वांना समान संधी देणारे स्वतंत्र तंत्रज्ञानाचे प्लॅटफॉर्म विकसित करण्याचे स्पष्ट निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले आहेत. परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी महाराष्ट्र मोटार व्हेईकल ॲग्रीगेटर रुल्स, २०२६ अंतर्गत समुच्चय वाहन धोरणाच्या अंमलबजावणीबाबत मुख्यमंत्र्यांकडे एक सविस्तर सादरीकरण केले. त्यानंतर हा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला आहे.

प्रवास वाटप प्रणालीत पारदर्शकतेचा अभाव

सध्या राज्यात ओला, उबर व इतर कंपन्यांच्या माध्यमातून प्रवासी वाहतूक मोठ्या प्रमाणावर विस्तारत आहे. मात्र, या कंपन्यांच्या अल्गोरिदमची कार्यपद्धती स्पष्ट नसल्यामुळे स्वतंत्र टॅक्सी चालकांना अनेक अडचणींचा सामना करावा लागत आहे. विमानतळासारख्या प्रमुख आणि जास्त उत्पन्नाच्या ठिकाणांहून मोठ्या फ्लीट ऑपरेटरच्या चालकांना प्राधान्य दिले जाते, तर स्वतंत्र चालकांना कमी उत्पन्नाच्या फेऱ्या दिल्या जात असल्याच्या तक्रारी वारंवार समोर येत आहेत. या पार्श्वभूमीवर प्रवास वाटपात चालकांचा कोणताही भेदभाव होऊ नये, यासाठी पारदर्शक यंत्रणा उभारण्याची मागणी करण्यात आली आहे.

समान नियम आणि चालकांच्या रोजगाराचे संरक्षण

मोठ्या फ्लीट ऑपरेटर कंपन्यांच्या तुलनेत स्वतंत्र चालकांच्या किरकोळ चुकांवर त्यांचे खाते तात्काळ बंद करणे किंवा निलंबनाची कठोर कारवाई केली जाते. एव्हरेस्ट फ्लीट्स, मूव्ह फ्लीट आणि क्रॅम फ्लीट यांसारख्या मोठ्या ऑपरेटरना मिळणाऱ्या कथित प्राधान्यामुळे स्वतंत्र चालकांच्या रोजगारावर मोठा परिणाम होत आहे. त्यामुळे सर्व घटकांसाठी समान नियम, समान निकष आणि निष्पक्ष कार्यपद्धती असावी, अशी आक्रमक भूमिका सादरीकरणात मांडण्यात आली.

उत्पन्न, सामाजिक सुरक्षा आणि तांत्रिक लेखापरीक्षण

चालकांच्या आर्थिक व सामाजिक सुरक्षिततेचा मुद्दाही या बैठकीत प्रकर्षाने मांडण्यात आला. त्यानुसार खालील मुद्द्यांवर स्पष्टता आणण्याचे निर्देश आहेत:

प्रवासाचे भाडे निश्चित करणे, प्रोत्साहनपर रक्कम आणि चालकांच्या मूल्यांकनात पारदर्शकता असावी.

चालकांना मिळणारे निश्चित उत्पन्न, कामाचे तास, विमा संरक्षण, भविष्य निर्वाह निधी (पीएफ) आणि कर्मचारी राज्य विमा (ईएसआय) यांसारख्या सुविधांची अंमलबजावणी व्हावी. प्रवास वाटप, जिओ-फेन्सिंग, लाइव्ह जिओ-लोकेशन आणि वाढीव भाडे निश्चिती या तांत्रिक प्रणालींचे स्वतंत्र लेखापरीक्षण केले जावे.

न्याय्य स्पर्धेचे वातावरण निर्माण होणार

समुच्चय वाहन धोरणाचा मूळ उद्देश केवळ कंपन्यांवर नियंत्रण ठेवणे नसून स्वतंत्र टॅक्सी चालकांसह सर्व घटकांना समान संधी देणे हा आहे. या नव्या धोरणामुळे आणि तंत्रज्ञानाधारित प्लॅटफॉर्ममुळे स्वतंत्र चालकांच्या रोजगाराचे रक्षण होईल, स्थानिक भूमिपुत्रांना व्यवसायाच्या समान संधी मिळतील आणि प्रवाशांना सुरक्षित व परवडणारी सेवा मिळण्यास मदत होईल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला आहे.

चक्रीवादळ 'अर्णब'च्या संकटात केंद्र सरकार मदतीला

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

नवी दिल्ली : चक्रीवादळ 'अर्णब'मुळे निर्माण झालेल्या गंभीर परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी गुरुवारी आंध्र प्रदेश, पुद्दुचेरी, ओडिशा आणि छत्तीसगड या चार राज्यांच्या मुख्यमंत्र्यांशी दूरध्वनीवरून सविस्तर चर्चा केली. या संकटाच्या वेळी नागरिकांचे हाल कमी करण्यासाठी आणि आपत्तीचा सामना करण्यासाठी केंद्र सरकारकडून सर्वतोपरी मदत केली जाईल, असे ठाम आश्वासन त्यांनी सर्व मुख्यमंत्र्यांना दिले. भारतीय हवामान विभागाने दिलेल्या माहितीनुसार, किनारपट्टीचा भाग असलेल्या आंध्र प्रदेश, यानम आणि लगतच्या बंगालच्या उपसागरात निर्माण झालेले हे तीव्र चक्रीवादळ गेल्या काही तासांत ताशी ८ किलोमीटरच्या धीम्या गतीने पुढे सरकले आहे. हळूहळू या चक्रीवादळाची तीव्रता कमी झाली असून आता त्याचे रूपांतर एका सामान्य चक्रीवादळात झाले आहे.

हवामान खात्याने वर्तवलेल्या अंदाजानुसार, हे चक्रीवादळ पुढील ४८ तासांत उत्तर-पश्चिम दिशेने सरकण्याची शक्यता आहे. या काळात त्याची ताकद आणखी क्षीण होईल आणि २८ ऑक्टोबर २०२६ च्या मध्यरात्रीपर्यंत या चक्रीवादळाचे रूपांतर 'डिप डिप्रेशन'मध्ये (गंभीर कमी दाबाच्या पट्ट्यात) होईल. आपत्ती व्यवस्थापनाबाबत माहिती देताना अमित शहा म्हणाले की, राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दल आणि राज्य आपत्ती प्रतिसाद दल च्या तुकड्या तात्काळ घटनास्थळी तैनात करण्यात आल्या आहेत. बाधित भागात नागरिकांची सुरक्षित सुटका करणे, अडकलेल्या लोकांना सुरक्षित स्थळी हलवणे आणि मदत सामग्री पोहोचवणे ही कामे युद्धपातळीवर केली जात आहेत.

गृहमंत्री अमित शहा यांनी त्यांच्या अधिकृत सोशल मीडिया प्लॅटफॉर्म 'द' वर माहिती शेअर करताना लिहिले: चक्रीवादळ 'अर्णब'च्या पार्श्वभूमीवर आंध्र प्रदेश, पुद्दुचेरी, ओडिशा आणि छत्तीसगडच्या मुख्यमंत्र्यांशी चर्चा केली. या नैसर्गिक आपत्तीच्या काळात नागरिकांना कमीत कमी त्रास व्हावा यासाठी केंद्राकडून सर्व प्रकारचे सहकार्य करण्याचे आश्वासन देण्यात आले आहे. वादळामुळे झालेल्या नुकसानीचा अचूक अंदाज घेण्यासाठी केंद्र सरकार लवकरच 'आंतर-मंत्रालयीन केंद्रीय पथके' बाधित राज्यांमध्ये पाठवणार असल्याचेही गृहमंत्र्यांनी स्पष्ट केले. ही पथके स्थानिक प्रशासनाच्या सहकार्याने शेती, मालमत्ता, पायाभूत सुविधा आणि जीवितहानीच्या प्रमाणाचा आढावा घेतील. या अहवालानंतर राज्यांना अतिरिक्त आर्थिक आणि पायाभूत मदत जाहीर केली जाईल. भारत सरकार पूर्ण कटिबद्धतेसह या कठीण काळात बाधित भागातील जनतेच्या पाठीशी खंबीरपणे उभे आहे, असा विश्वास गृहमंत्र्यांनी व्यक्त केला. स्थानिक प्रशासनाला सतर्क राहण्याच्या सूचना देण्यात आल्या असून किनारपट्टीच्या भागातील नागरिकांना सुरक्षेचे नियम पाळण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

अंगणवाडी कर्मचाऱ्यांच्या प्रोत्साहन भत्त्याच्या निकषांत सुधारणा करा : मंत्री आदिती तटकरे

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

मुंबई : अंगणवाडी सेविका व मदतनीस यांना देण्यात येणाऱ्या प्रोत्साहन भत्त्याच्या निकषांमध्ये सुधारणा करण्याचे निर्देश महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी दिले.

प्रोत्साहन भत्त्याच्या सुधारित निकषांबाबत कर्मचारी संघटनांच्या मागणीसंदर्भात मंत्रालयात बैठक झाली. त्यावेळी मंत्री आदिती तटकरे यांनी पोषण, आरोग्य, पूर्वशालेय शिक्षण, उपस्थिती आणि गृहभेटी आदी निकषांच्या आधारे प्रोत्साहन भत्ता निश्चित करण्याच्या अनुषंगाने प्रस्ताव तयार करण्याच्या सूचना दिल्या. यावेळी बैठकीस एकात्मिक बालविकास सेवा योजना आयुक्त माधवी सरदेशमुख, सहसचिव वी. रा. ठाकूर आदीसह अधिकारी उपस्थित होते. राज्यात शून्य ते सहा वर्षे वयोगटातील बालकांचे तसेच गर्भवती मातांच्या पोषणाची काळजी घेण्यासाठी १,०८,६२७ अंगणवाडी सेविका आणि १,०५,४७० अंगणवाडी मदतनीस कार्यरत आहेत. अंगणवाडी सेविका व मदतनीस यांना त्यांच्या कामाच्या गुणवत्तेनुसार अनुक्रमे ₹१,५०० ते ₹२,००० आणि ₹५०० ते ₹१,००० प्रतिमाह प्रोत्साहन भत्ता १ ऑक्टोबर २०२४ पासून लागू करण्यात आला आहे. यावेळी, एकात्मिक बाल विकास सेवा योजना आयुक्तालयामार्फत राबविण्यात येणाऱ्या अतिरिक्त आहार योजना, आदर्श अंगणवाडी योजना आणि बेबी केअर किट योजना यांचाही बैठकीत आढावा घेण्यात आला.

निवृत्तीला फक्त दोनच दिवस बाकी, पण पैशांचा मोह नडला, आयुक्त रवींद्र जाधव यांचेसह अजून दोघांना एसीबीने घेतले ताब्यात

८० हजारांची लाच मागितली, मालेगाव महापालिका आयुक्तांवर कारवाई

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

मालेगाव : निवृत्तीला अवघे दोन दिवस बाकी असताना मालेगाव महापालिका आयुक्त रवींद्र जाधव यांना पैशांचा हव्यास नडला आहे. आयुक्त रवींद्र जाधव हे लाचलुचपत विभागाच्या जाळ्यात अडकले आहेत. ८० हजार रुपयांची लाच मागितल्या प्रकरणी लाचलुचपत प्रतिबंधक विभागानं ही कारवाई केली आहे. ३१ ऑक्टोबरला ते सेवानिवृत्त होणार होते. दरम्यान, मालेगाव महापालिका आयुक्त रवींद्र जाधव यांनी लाच मागितल्याच्या घटनेवरुन कारवाई केल्यानंतर खळबळ उडाली आहे.

मालेगाव महापालिकेचे आयुक्त रवींद्र जाधव हे ३१ ऑक्टोबरला शासकीय सेवेतून सेवानिवृत्त होणार असतानाच एका ठेकेदाराचे बिले काढून देण्यासाठी चार टक्क्यांची ८० हजार रुपयांची लाच मागितल्या प्रकरणी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या जाळ्यात अडकले आहेत. केवळ दोन दिवस सेवानिवृत्तीला असतांना पैशाचा हव्यास नडला आणि कारवाईला सामोरे जावे लागले. यापूर्वी धुळे येथील एक कारवाईचा ससेमिरा पाठीशी असताना दुसऱ्यांदा पुन्हा लाचलुचपत विभागाच्या जाळ्यात अडकल्याने मालेगावच्या प्रशासकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे. या कारवाईनंतर त्यांच्या निवासस्थानी उइ च्या अधिकाऱ्यांनी झाडाझडती घेतली. आयुक्त रवींद्र जाधव यांचेसह अजून दोघांना एसीबीने ताब्यात घेतले आहे..या तपासातून काय समोर येणार, याकडे लक्ष लागलं आहे.

धुळे महापालिकेचे प्रभारी अतिरिक्त आयुक्त पद असतांना उपायुक्त रवींद्र जाधव यांना (१४ जानेवारी २०१९) त्यांच्या निवासस्थानी उपशिक्षकाकडून पंधरा हजारांची लाच स्वीकारताना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने ताब्यात घेतले होते..

रवींद्र जाधव यांची मालेगावी महापालिकेवर नियुक्ती झाल्यानंतर त्यांच्या नियुक्तीला मालेगावकर विधायक संघर्ष समितीने विरोष करत आंदोलन केले. भ्रष्ट अधिकारी महापालिकेवर बसवू नका अशी त्यांची मागणी होती..मालेगावात त्यांच्या नियुक्तीला व कार्यपद्धतीला काही स्थानिक आघाड्यांनी व संघटनांनी विरोध दर्शवला होता.

रवींद्र जाधव हे अवघ्या दोन दिवसानंतर म्हणजेच ३१ ऑक्टोबर २०२६ ला प्रशासकीय सेवा संपून सेवानिवृत्त होणार होते.

मालेगाव महापालिकेचे आयुक्त रवींद्र जाधव यांच्या प्रशासकीय कार्यकाळात कचरा संकलन निविदा, मोसम नदी प्रदूषण, जन्मदाखले आणि महापालिकेतील आर्थिक व्यवहार अशा विविध मुद्द्यांवरून वाद निर्माण झाले. या प्रकरणांवर राजकीय पक्ष, सामाजिक संघटना आणि नागरिकांनी आक्षेप घेतले आहेत.

संपादकीय....

मनमानीला चाप

राज्यातील ॲप-आधारित प्रवासी वाहतूक क्षेत्रात स्वतंत्र टॅक्सी चालकांना न्याय मिळवून देण्यासाठी राज्य सरकारने आता कठोर पावले उचलली आहेत. ओला, उबर आणि इतर मोठ्या फ्लीट ऑपरेटर कंपन्यांच्या मनमानी कारभाराला आळा घालण्यासाठी आणि प्रवाशांच्या वाटपात पारदर्शकता आणण्यासाठी सर्वांना समान संधी देणारे स्वतंत्र तंत्रज्ञानाचे प्लॅटफॉर्म विकसित करण्याचे स्पष्ट निर्देश नुकतेच मुख्यमंत्र्यांनी दिले. परिवहन मंत्र्यांनी महाराष्ट्र मोटार व्हेईकल ॲग्रीगेटर रुल्स, २०२६ अंतर्गत समुच्चय वाहन धोरणाच्या अंमलबजावणीबाबत मुख्यमंत्र्यांकडे एक सविस्तर सादरीकरण केले. त्यानंतर हा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला आहे. सध्या राज्यात ओला, उबर व इतर कंपन्यांच्या माध्यमातून प्रवासी वाहतूक मोठ्या प्रमाणावर विस्तारत आहे. मात्र, या कंपन्यांच्या अल्गोरिदमची कार्यपद्धती स्पष्ट नसल्यामुळे स्वतंत्र टॅक्सी चालकांना अनेक अडचणींचा सामना करावा लागत आहे. विमानतळासारख्या प्रमुख आणि जास्त उत्पन्नाच्या ठिकाणांहून मोठ्या फ्लीट ऑपरेटरच्या चालकांना प्राधान्य दिले जाते, तर स्वतंत्र चालकांना कमी उत्पन्नाच्या फेऱ्या दिल्या जात असल्याच्या तक्रारी वारंवार समोर येत आहेत. या पार्श्वभूमीवर प्रवास वाटपात चालकांचा कोणताही भेदभाव होऊ नये, यासाठी पारदर्शक यंत्रणा उभारण्याची मागणी करण्यात आली आहे. मोठ्या फ्लीट ऑपरेटर कंपन्यांच्या तुलनेत स्वतंत्र चालकांच्या किरकोळ चुकांवर त्यांचे खाते तात्काळ बंद करणे किंवा निलंबनाची कठोर कारवाई केली जाते. एव्हरेस्ट फ्लीट्स, मूव्ह फ्लीट आणि क्रॅम फ्लीट यांसारख्या मोठ्या ऑपरेटरना मिळणाऱ्या कथित प्राधान्यामुळे स्वतंत्र चालकांच्या रोजगारावर मोठा परिणाम होत आहे. त्यामुळे सर्व घटकांसाठी समान नियम, समान निकष आणि निष्पक्ष कार्यपद्धती असावी, अशी आक्रमक भूमिका सादरीकरणात मांडण्यात आली. चालकांच्या आर्थिक व सामाजिक सुरक्षिततेचा मुद्दाही या बैठकीत प्रकर्षाने मांडण्यात आला.

काळजी आणि समर्थन : समाज समृद्धीचे मुख्य घटक

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क
(२९ ऑक्टो. ते ०४ नोव्हें.:आंतरराष्ट्रीय काळजी आणि समर्थन दिन सप्ताह.)

आंतरराष्ट्रीय काळजी आणि समर्थन दिन समाजातील अशा घटकांच्या समर्थनासाठी साजरा केला जातो ज्यांना विशेष काळजी, मदत, आणि सहकार्याची आवश्यकता असते. यामध्ये वृद्ध, दिव्यांग, आजारी व्यक्ती, आणि समाजातील दुर्बल घटकांचा समावेश होतो. या दिवसाचे उद्दिष्ट म्हणजे या लोकांना सामाजिक, आर्थिक, आणि मानसिक आधार देणे आणि त्यांच्याबद्दल सहानुभूती, आदर, आणि समर्पण निर्माण करणे आहे.श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरुजी सदर माहितीपूर्ण संकलित लेख प्रस्तुत करताहेत जी.... संपादक.

आणि समर्थन हे समाजाच्या समृद्धीचे मुख्य घटक आहेत. या दिवशी विविध सामाजिक संघटना, स्वयंसेवक, आणि शासकीय यंत्रणा एकत्र येऊन विविध उपक्रम राबवतात ज्यामध्ये आरोग्य तपासणी, आर्थिक मदत, आणि शैक्षणिक संधींचा समावेश होतो. समाजातील प्रत्येक व्यक्तीने इतरांच्या काळजीत सहभागी होण्याची आणि त्यांना मानसिक व भावनिक आधार देण्याची जबाबदारी घेतली पाहिजे. आंतरराष्ट्रीय काळजी आणि समर्थन दिनाचा मुख्य उद्देश एक सशक्त आणि समजूतदार समाज निर्माण करणे आहे, ज्यामुळे प्रत्येकजण एकमेकांच्या आधाराने एकत्र राहून प्रगती करू शकेल.

जागतिक काळजी दिनाचा इतिहास :जागतिक काळजी दिनाची सुरवात दि.७ जून १९९७ रोजी ब्रिघिड नावाच्या बाळाच्या नऊ दिवसांच्या आयुष्यापासून सुरू झाली. अकाली जन्म झाल्यानंतर सॉफ्टवेअर अभियंता सोना मेहरिंग यांनी पहिली केअरिंगब्रिज वेबसाइट तयार केली. सोनामुळे मित्र आणि कुटुंबियांना बाळ ब्रिघिडच्या आरोग्याबद्दल ऑनलाइन अपडेट्स मिळू शकले. सर्वात महत्त्वाचे म्हणजे वेबसाइटने ब्रिघिड आणि तिच्या कुटुंबाला आवश्यक गोष्टी आणि आराम दिला. त्यावेळी सोशल मीडिया प्लॅटफॉर्म अस्तित्वात नसल्याने वेबसाइट तयार करण्याची कल्पना क्रांतिकारी होती. तसेच या दिवसाचा मुख्य उद्देश म्हणजे काळजी घेणे आणि करुणा बाळगणे किती महत्त्वाचे आहे? याची आठवण करून देणे होय. हा असा दिवस आहे, जेव्हा लोक एकमेकांबद्दल अधिक संवेदनशील आणि आधार देऊ शकतात. तसेच जागतिक काळजी दिन साजरा करण्याचे अनेक मार्ग आहे. जसे की, इतरांची काळजी घेणे. आपण आपल्यासोबत इतरांची काळजी घेणे देखील तेवढेच महत्वाचे असते. तसेच आपण स्वतःसोबत कुटुंबाची, मित्रांची आणि नातेवाईकांची-शेजाऱ्यांची, प्राण्याची, पक्ष्यांची देखील काळजी घ्यावी. यामधून आत्मिक समाधान नक्कीच मिळते. तसेच एखाद्यासाठी वेळ काढा, त्यांना मदत करा किंवा त्यांच्याशी बोला. निसर्गाबद्दल सहानुभूती दाखवा. तसेच इतरांशी दयाळू आणि आधार देणारे व्हा. इतरांच्या भावना समजून घ्या आणि त्यांना पाठिंबा द्या. तसेच प्रत्येकाने आपली शारीरिक, मानसिक आणि भावनिक आरोग्याची काळजी घ्या. निरोगी जीवनशैली पाळावी, पुरेशी झोप घेऊन नियमितपणे व्यायाम करावा. जागतिक काळजी दिन हा असा दिवस आहे जेव्हा आपण एकमेकांबद्दल अधिक काळजी आणि करुणा दाखवू शकतो, जेव्हा आपण आपल्या सभोवतालच्या लोकांना आधार देऊ शकतो आणि त्यांना बरे वाटू शकतो. तसेच जागतिक काळजी दिनाचे महत्त्व इतरांना पटवून द्यावे. या दिवसाचे महत्त्व अधोरेखित करण्यासाठी आपण सोशल मीडिया आणि इतर माध्यमांचा वापर देखील करू शकता.

आंतरराष्ट्रीय काळजी आणि समर्थन दिनाचा इतिहास:

१०० हून अधिक देशांनी सह-प्रायोजित केलेल्या एका ठरावानंतर, सन २०२३ मध्ये संयुक्त राष्ट्र महासभेने ''आंतरराष्ट्रीय काळजी आणि आधार दिन'' घोषित केला. या ठरावाने मानवी कल्याण, शाश्वत विकास आणि लैंगिक समानता यांना प्रोत्साहन देण्यासाठी काळजी आणि आधाराच्या सर्व स्वरूपांमधील अत्यावश्यक भूमिकेला मान्यता दिली. या दिवसाचा इतिहास २००० च्या दशकाच्या सुरुवातीपर्यंत शोधता येतो, जेव्हा अनेक कामगार संघटना आणि नागरी समाज संघटनांनी काळजीवाहकांच्या कार्याला मान्यता देण्यासाठी आणि त्याचा गौरव करण्यासाठी एका जागतिक दिवसाची मागणी करण्यास सुरुवात केली. सन २०१६ मध्ये आयएलओने ''केअर अजेंडा'' सुरू केला, ज्यामध्ये काळजी आणि सहाय्य प्रणालींमध्ये वाढीव गुंतवणुकीची आणि विनामोबदला काळजी कार्याला मान्यता व मूल्यमापन करण्याची मागणी करण्यात आली.

कोविड-१९ महामारीने काळजी आणि समर्थनाचे महत्त्व अधिक अधोरेखित केले, कारण महामारीला प्रतिसाद देण्यात काळजीवाहकांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. त्यांच्या योगदानाला मान्यता देण्यासाठी, संयुक्त राष्ट्र महासभेने दि.२९ ऑक्टोबर २०२३ रोजी पहिला ''आंतरराष्ट्रीय काळजी आणि समर्थन दिन'' घोषित केला .

जागतिक काळजी आणि समर्थन दिनाचे महत्त्व : यामध्ये विनामोबदला काळजीचे काम, पगारी काळजीचे काम आणि औपचारिक काळजी सेवा यांसह काळजी आणि समर्थनाच्या सर्व स्वरूपांच्या महत्त्वाविषयी जागरूकता निर्माण केली जाते.

हे पगारी आणि बिनपगारी अशा दोन्ही प्रकारच्या काळजी वाहकांच्या अत्यावश्यक योगदानाला मान्यता देते.

ते काळजी आणि सहाय्य प्रणालींना समर्थन देणाऱ्या व त्यांमध्ये सुधारणा करणाऱ्या धोरणांचे आणि उपक्रमांचे समर्थन करते. हे कोविड-१९ महामारीतून न्याय्य आणि सर्वसमावेशक पुनर्प्राप्तीला प्रोत्साहन देते, तसेच काळजी हा शाश्वत पुनर्प्राप्तीचा एक मुख्य आधारस्तंभ आहे हे मान्य करते.

मानवी कल्याण, शाश्वत विकास आणि लैंगिक समानतेसाठी काळजी आणि आधार अत्यावश्यक आहेत. काळजीवाहू व्यक्ती समाजात एक महत्त्वाची भूमिका बजावतात, परंतु अनेकदा त्यांचे महत्त्व कमी लेखले जाते आणि त्यांच्या कार्याची कदर केली जात नाही. हा दिवस ती परिस्थिती बदलण्याची एक नामी संधी आहे.

दि.२९ ऑक्टोबर २०२४ विशेष दिवस: दि.२९ ऑक्टोबर २०२४ रोजी, जगभरात ''आंतरराष्ट्रीय काळजी आणि आधार दिन'' साजरा केला जातो, जो काळजी वाहकांच्या अमूल्य योगदानाला मान्यता देतो. हा दिवस विविध संदर्भांमध्ये काळजी अधिक मजबूत आणि सुधारित करण्याच्या उद्देशाने आखलेल्या धोरणांचे आणि उपक्रमांचे महत्त्व अधोरेखित करतो. व्यक्तींना आधार देण्यात आणि सर्व आयामांमध्ये करुणामय काळजीला महत्त्व देणाऱ्या व प्रोत्साहन देणाऱ्या संस्कृतीला चालना देण्यात काळजीवाहक बजावत असलेल्या महत्त्वपूर्ण भूमिकेची ही एक हृदयस्पर्शी आठवण आहे. विविध समाज माध्यमांवरुन सविनय साभार जी !

!! आंतरराष्ट्रीय काळजी आणि समर्थन दिनाच्या सर्वांना हार्दिक हार्दिक शुभेच्छा जी !!

– संकलन व सुलेखन –
कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरुजी.
राह. पॉवर हाऊसच्या मागे, एकता चौक, रामनगर वॉर्ड, गडचिरोली.
फक्त मधुभाष- ९६९९८३६७१७.

कीर्तनातून संत विचारांचे शुद्धपणे प्रबोधन करावे : डॉ. उल्हासदादा पवार

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

आळंदी, पुणे : वारकरी सांप्रदाय संतांच्या विचारांचा वारसा जपणारा ज्ञान समृद्ध सांप्रदाय आहे. हा सांप्रदाय समता, बंधुभाव आणि शिस्तीची जगातील सर्वांत मोठी परंपरा जपतो. त्यामुळे कीर्तनातून संत विचारांचे शुद्धपणे प्रबोधन होणे गरजेचे आहे. असे विचार जेष्ठ साहित्यिक आणि संत साहित्याचे गाढे अभ्यासक डॉ. उल्हासदादा पवार यांनी व्यक्त केले. विश्वशांती केंद्र आळंदी, माईर्स एमआयटी पुणे, महाराष्ट्र साहित्य परिषद आणि महाराष्ट्र शासनाचा मराठी भाषा विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने १०० व्या साहित्य संमेलनाच्या पार्श्वभूमीवर आयोजित आळंदीतील १७ व्या नांदी संमेलनाचे अध्यक्ष म्हणून यावेळी ते बोलत होते. या संमेलनाचे उद्घाटन ज्येष्ठ गायिका उषाताई मंगेशकर यांच्या हस्ते झाले. यावेळी माजी संमेलनाध्यक्ष व जेष्ठ साहित्यिक डॉ. श्रीपाल सबनीस हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

६९ व्या साहित्य संमेलनाचे स्वागताध्यक्ष व माईर्स विश्वशांती विद्यापीठाचे संस्थापक अध्यक्ष विश्वधर्मी प्रा. डॉ. विश्वनाथ कराड यांचा याप्रसंगी विशेष सन्मान करण्यात आला.

यावेळी मसापचे कोशाध्यक्ष प्रदीप निफाडकर, कार्यवाह सुनील महाजन, राजन लाखे, प्रभाकर ओव्हाळ, बबनराव कुऱ्हाडे, आळंदी नगर परिषदेच्या उपाध्यक्षा सुजाता तापकीर, नगरसेविका पूजा घुंडरे आणि माईर्स एमआयटी संस्थेच्या महासचिव प्रा. स्वाती कराड - चाटे आदी उपस्थित होते.

याप्रसंगी विशेष स्मरणिकेचे प्रकाशन करण्यात आले.

डॉ. उल्हासदादा पवार म्हणाले,भाषा ही संस्कृतीची खरी वाहक आहे, आपली अभिजात लोकसंस्कृती टिकवायची असेल तर मराठी भाषा जोपासली पाहिजे. आज समाजात वितंडवाद नव्हे तर संतांच्या साहित्यावर सुसंवाद आणि परिसंवाद घडावा.

डॉ. श्रीपाल सबनीस म्हणाले, संतत्वाची साथ सोडल्यामुळेच समाजाचे नैतिक अधःपतन झाले आहे; दांभिकता आणि अंधश्रद्धा बाजूला सारून सर्वांनी संतांच्या विचारांचा एकात्म महाराष्ट्र घडवावा. संत परंपरेतून विश्वशांतीचा ध्यास घेणारे प्रा. डॉ. विश्वनाथ दा. कराड 'हे विश्वचि माझे घर' म्हणणाऱ्या संत ज्ञानेश्वरांचे खरे पाईक आहेत.

उषाताई मंगेशकर म्हणाल्या,संत ज्ञानेश्वरांच्या 'भावार्थदीपिके'तील ओव्यांना हृदयनाथजींनी संगीताचा साज चढवला आणि लतादीदींनी आपल्या स्वराने घराघरांत पोहोचवल्या. माउलींच्या या पावन भूमीत डॉ. कराड यांनी निस्वार्थ भावनेतून केलेले कार्य कौतुकास्पद आहे.

प्रा. स्वाती कराड - चाटे म्हणाल्या, मराठी भाषेचे संवर्धन करणे, पुढच्या पिढीला तिची ओळख करून देणे ही शिक्षण संस्थांची जबाबदारी आहे. चांगल्या साहित्यातूनच समाज समृद्ध होतो. म्हणून मुलांमध्ये संत साहित्याचा विचार रुजवावा. नांदी संमेलनाच्या निमित्ताने ज्ञानेश्वर माउलींच्या पावन भूमीत 'तीर्थक्षेत्राकडून ज्ञानतीर्थक्षेत्राकडे' होणारी ही वाटचाल मराठी भाषेला अधिक बळकटी देईल.

आळंदीत 'साहित्य निष्ठांची मांदियाळी' या संतसाहित्य नांदी संमेलनाचे उद्घाटन संपन्न

याप्रसंगी मसापचे कोषाध्यक्ष प्रदीप निफाडकर आणि कार्यवाह सुनील महाजन यांनी पुण्यात होणाऱ्या १०० व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाला आळंदीतील साहित्यप्रेमींनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्यासाठी निमंत्रण दिले. डॉ. अतुल कुलकर्णी यांनीसूत्रसंचालन केले. डॉ. महेश थोरवे यांनी आभार मानले.

आज जग अशांततेच्या उंबरठ्यावर असताना संतांच्या तत्त्वज्ञानाची गरज पूर्वीपेक्षा अधिक भासत आहे. केवळ भौतिक विज्ञानाने मानवाला शांती, सुख आणि समाधान लाभू शकत नाही. विज्ञान आणि अध्यात्म जेव्हा एकत्र येईल, तेव्हाच जगात खरी शांतता प्रस्थापित होईल आणि मानवाचे कल्याण होईल.
विश्वधर्मी. प्रा. डॉ. विश्वनाथ दा. कराड
संस्थापक, अध्यक्ष माईर्स एमआयटी विश्वशांती विद्यापीठ, पुणे.
विभाग,
माईर्स एमआयटी, पुणे

लतादेवी पाटील यांना राज्यस्तरीय प्रेरणा पुरस्कार

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

पंढरपूर/प्रतिनिधी : पंढरपूर येथील गंधर्व संगीत विद्यालयाच्या अध्यक्षा ह.भ.प.लतादेवी सागर पाटील यांना सोलापूर येथे डॉ. अब्दुल कलाम राष्ट्रीय प्रेरणा पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.

वितरण ड्रीम फाउंडेशन सोलापूर व डॉ. कलाम कौशल्य विकास केंद्र पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने सोलापूर येथील हुतात्मा स्मृती मंदिरामध्ये संपन्न झाला.

यावेळी मा.खासदार बसवराज पाटील, वरिष्ठ वैज्ञानिक डॉ.अशोक नगरकर, ड्रीम फाउंडेशनचे अध्यक्ष काशिनाथ भतगुणकी, सचिव संगीता पाटील उपस्थित होते. पुरस्कार मिळाल्यानंतर त्यांचा सन्मान ह.भ.प. शोभा भोसले यांच्या हस्ते करण्यात आला.

किशोरवयीन मुलींसाठी पिंक रूम

कल्याणशेट्टी विद्यालयाची योजना कौतुकास्पद : डॉ. सुचित्रा महिंद्रकर

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

अक्कलकोट : मुलींना प्रशालेत शिक्षण घेत असताना आरोग्यविषयक आव्हानांचा सामना करावा लागतो. त्यावेळी त्यांना हक्काची आणि सुरक्षित जागा मिळाली पाहिजे म्हणून कल्याणशेट्टी प्रशालेमध्ये पिंक रूमची व्यवस्था करण्यात आली आहे. ही त्यांची तत्परता कौतुकास्पद आहे असे प्रतिपादन ग्रामीण रुग्णालयातील वैद्यकीय अधिकारी डॉ सुचित्रा महिंद्रकर यांनी केले.

महर्षी विवेकानंद समाजकल्याण संस्था संचलित सौ सुरेखा कल्याणशेट्टी प्रशालेतील पिंक रूमचा शुभारंभ करताना त्या बोलत होत्या. अध्यक्षस्थानी जिल्हा परिषद सदस्या शांभवी कल्याणशेट्टी होत्या यावेळी डॉ सतीश बिराजदार, ज्येष्ठ संचालक मल्लिनाथ कल्याणशेट्टी, सचिव मल्लिकार्जुन मसुती, पुनम कोकळगी, रूपाली शहा, आधिपरिचारिका शितल जाधव, उज्वला फडतरे, मुख्याध्यापक मलकप्पा भरमशेट्टी उपस्थित होते.

डॉ सतीश बिराजदार म्हणाले की, मासिक पाळी हा प्रत्येक मुलीच्या जीवनातील नैसर्गिक भाग आहे, परंतु या काळात आवश्यक असणाऱ्या सुविधांच्या अभावामुळे अनेकदा त्यांना नको त्या मनस्तापाला सामोरे जावे लागते. म्हणून प्रशालेत पिंक रूम असणे आवश्यक आहे.

सौ सुरेखा कल्याणशेट्टी प्रशालेत किशोरवयीन मुलींसाठी पिंक रूम सुविधाचा शुभारंभ

कार्यक्रमाचे प्रास्ताविक चक्व् विभाग प्रमुख मनिषा सुरवसे यांनी केले, सूत्रसंचलन निशिगंधा सोमेश्वर यांनी केले तर आभार कल्पना स्वामी यांनी मानले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी पूजा कडगावकर, विद्या बिराजदार,आरती थोरात यांनी प्रयत्न केले.

'पिंकरूम' च्या आत किशोरवयीन मुलींना सॅनिटरी पॅड्स, अचानक अशक्तपणा किंवा पोटदुखी जाणवल्यास विश्रांतीसाठी आरामदायी बेड, तसेच प्रथमोपचार पेटी, शुद्ध पिण्याचे पाणी ठेवण्यात आले आहे अशी माहिती मुख्याध्यापक मलकप्पा भरमशेट्टी यांनी दिली.

मुलींसाठी पिंकरूम मध्ये सुविधा पिंकरूम मुळे आत्मविश्वास वाढतो

किशोरवयीन मुली मासिक पाळीच्या काळात शाळा किंवा महाविद्यालयात जाणे टाळतात. काही मुलींचे शिक्षण यामुळे खंडित होते. मात्र, शैक्षणिक संस्थांमध्ये पिंक रूम उपलब्ध असल्यास मुलींचा आत्मविश्वास वाढतो. असे प्रतिपादन शांभवीताई कल्याणशेट्टी यांनी केले.

कळंब येथे दुष्काळाच्या नियोजनासाठी स्वयं शिक्षण प्रयोग संस्थेची कार्यशाळा संपन्न

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

कळंब/प्रतिनिधी : स्वयं शिक्षण प्रयोग संस्था अंतर्गत कळंब पंचायत समिती सभागृहात तालुकास्तरीय संवाद कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेत शेतकरी महिला व व्हिलेज ॲक्शन ग्रुप लीडर्सनी दुष्काळी परिस्थितीमध्ये पाणीटंचाई, जनावरांचा चारा, रोजगार या विषयावर चर्चेत सहभाग घेतला.

कार्यक्रमाच्या उद्घाटन प्रसंगी पंचायत समिती सभापती राजश्री वरपे, मनिषा सुकाळे, दिलशाद तांबोळी, सचिन क्षिरसागर, माधवसिंग राजपूत, भरती शुक्ला, आचल जगदंडे आदी मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या सुरुवातीस सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेला मान्यवरांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आला.

याप्रसंगी पंचायत समिती सभापती राजश्री वरपे यांनी मार्गदर्शन करताना सांगितले की, पाणीटंचाई, जनावरांसाठी चारा व रोजगार या संकटावर मात करण्यासाठी शासन विविध उपाययोजना करीत आहे. या संकटाचा सर्वांनी मिळून सामना केला पाहिजे. ग्रामीण भागातील महिलांना रोजगार उपलब्ध करून दिला जाईल. तसेच त्यांनी डॉ. पंजाबराव देशमुख नैसर्गिक शेती मिशन योजनेबद्दल माहिती दिली.

सामाजिक कार्यकर्ते सचिन क्षिरसागर म्हणाले की, विकासाच्या नावाखाली राज्यात मोठ्या प्रमाणात वृक्षतोड झाली असून त्याचाच हा परिणाम आहे. दुष्काळी परिस्थितीत शासनाने शेतकरी, शेतमजूर, कामगार यांना रोजगार उपलब्ध करून दिला पाहिजे.

पाणीटंचाई, जनावरांचा चारा या विषयावर महिलांशी संवाद

पत्रकार माधवसिंग राजपूत यांनी पाण्याचा योग्य व गरजेपुरता वापर व्हावा, जनावरांसाठी चारा उपलब्धता व्हावी व मागेल त्याला काम मिळाले पाहिजे यासाठी नियोजन करण्याची गरज असल्याचे मत व्यक्त केले.

स्वयं शिक्षण प्रयोग संस्थेच्या दिलशाद तांबोळी यांनी एस.एस.पी. व शेतकरी कंपनी बद्दल माहिती देऊन महिलांना मार्गदर्शन केले. यावेळी सारिका जाधव, संगीता पालकर, राधा डिकले, अश्विनी काळे, कल्पना नाईकनवरे, शारदा पोळ, पूजा भवर, ज्योती महाजन, शीतल सरवदे, सुलोचना मोरे, आशा पाचभाई, छाया चंदनशिवे यांनी गावपातळीवरील अनुभव सांगितले.

ही कार्यशाळा यशस्वी करण्यासाठी विजयमाला शेंडगे, राधा डिकले, ज्योती महाजन, संगीता पालकर, पूजा भवर, राजश्री चव्हाण, आशा पाचभाई, कल्पना नाईकनवरे यांनी परिश्रम घेतले.

प्रास्ताविक दिलशाद तांबोळी यांनी केले, सूत्रसंचालन ज्योती महाजन यांनी केले तर आभार पूजा भवर यांनी मानले.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

वैराग पोलीस ठाण्यातील हवालदार लाच घेताना चतुर्भुज; १ लाखाची मागणी, वीस हजारावर तडजोड

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

पंढरपूर : वैराग पोलीस स्टेशन, सोलापूर ग्रामीण येथील पोलीस हवालदार संदेश कृष्णदेव पवार (वय,३१ राहणार शंभर फुटी शेजारी कशास हाडे रोड ,बार्शी) याला लास्ट लॉजपत प्रतिबंधक विभागान २०,०००/रुपयांची लाज स्वीकारताना रंग यात पकडले आहे.

तक्रारदार यांच्या मुलाविरुद्ध दाखल होण्यामध्ये मदत करतो. असे बोलून पवार यांनी एक लाख रुपयांची मागणी केली होती. तक्रारदार यांनी लाज देणे शक्य होणार नसल्याचे सांगितल्यानंतर तडजोडी आणती २० हजार रुपये जिम मागणी करण्यात आले याबाबत तक्रार प्राप्त झाली.

२८/१०/२०२६ तुझी वैराग येथील पोलीस स्टेशनमध्ये सापळा रासण्यात आला यावेळी पवार यांनी तक्रारदार यांच्याकडून लाची जी रक्कम स्वीकारले आहे. त्यांना २८/१०/२०२६ रोजी ४१.०० वाजता ताब्यात घेण्यात आली आहे.

या कारवाई पोलीस उपाधीक्षक प्रशांत चौगुले ला. प्र. वि. सोलापूर यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. पोलीस अधीक्षक श्रीराम सरदेशपांडे ला. प्र.वि. पुणे परिक्षेत्र व अप्पर पोलीस अधीक्षक अजित पाटील यांच्या मार्गदर्शन लाभले.

कॉरिडॉर : पंढरपुरातच सुरू होणार भूसंपादन विभागाचे तात्पुरते कार्यालय

जिल्हाधिकारी एस. कार्तीकेयन यांची माहिती

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

पंढरपूर : पंढरपूर कॉरिडॉर प्रकल्पामुळे बाधित होणाऱ्या मालमत्ताधारकांची गैरसोय टाळण्यासाठी भूसंपादन अधिकारी क्रमांक ३ यांचे तात्पुरते कार्यालय पंढरपुरात सुरू करण्यात येणार आहे. श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिर समितीच्या भक्त निवास येथे हे कार्यालय सुरू होणार असून, दर आठवड्याला मंगळवार, बुधवार आणि गुरुवार या तीन दिवशी कार्यालयीन कामकाज चालणार आहे. त्यामुळे भूसंपादनाच्या कामासाठी बाधितांना प्रत्येक वेळी सोलापूरला जाण्याची आवश्यकता राहणार नाही, अशी माहिती जिल्हाधिकारी एस. कार्तीकेयन यांनी दिली.

मंगळवार, बुधवार आणि गुरुवारी कार्यालय राहणार सुरू

राज्य शासनाच्या महत्त्वाकांक्षी 'श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिर परिसर विकास व वाणिज्य संकुल आराखडा तथा पंढरपूर कॉरिडॉर' प्रकल्पासाठी भूसंपादनाची प्रक्रिया सुरू आहे. या प्रकल्पासाठी अधिसूचित केलेल्या जमिनी सार्वजनिक प्रयोजनासाठी संपादित करण्यात येणार आहेत. या जमिनींमध्ये हितसंबंध असलेल्या मालमत्ताधारकांनी नुकसानभरपाईच्या अनुषंगाने आपले म्हणणे सादर करणे आवश्यक आहे.यासाठी बाधित मालमत्ता धारक यांना नोटीस बजावण्याची प्रक्रिया सध्या सुरू आहे. संबंधितांनी जिल्हाधिकारी, सोलापूर यांच्या वतीने उपजिल्हाधिकारी, भूसंपादन क्रमांक ३, सोलापूर यांच्या तात्पुरत्या कार्यालयात उपस्थित राहून आपले म्हणणे मांडावे. हे कार्यालय श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिर समितीच्या भक्त निवास येथे सुरू राहणार आहे.

भूसंपादनामुळे बाधित होणाऱ्या मालमत्ताधारकांनी नोटीस प्राप्त झाल्यापासून ३० दिवसांच्या आत कार्यालयीन वेळेत स्वतः अथवा अधिकृत प्रतिनिधी किंवा वकिलामार्फत आपले म्हणणे सादर करावे, असे आवाहन करण्यात आले आहे. संबंधितांनी बाधित होणाऱ्या जमिनीचे क्षेत्रफळ व तपशील, जमिनीवरील वास्तू, मालमत्तेचा वापर, मालमत्तेतील हितसंबंधांचे स्वरूप तसेच अपेक्षित नुकसानभरपाईची रक्कम, दाव्याचे तपशील, पुरावे आणि संबंधितांचा हिस्सा याबाबतची माहिती सादर करावी. जमिनी अथवा मालमत्तेसंदर्भात काही आक्षेप किंवा हरकती असल्यास त्या निर्धारित मुदतीत नोंदवाव्यात, असेही जिल्हाधिकारी एस. कार्तीकेयन यांनी सांगितले आहे.

पंढरपुरातच भूसंपादन विभागाचे तात्पुरते कार्यालय सुरू होणार असल्याने कॉरिडॉर बाधित मालमत्ताधारकांना मोठा दिलासा मिळणार आहे. सोलापूरला वारंवार जाण्याचा त्रास व वेळ वाचणार असून, भूसंपादन आणि नुकसान भरपाईसंदर्भातील प्रक्रिया अधिक सोयीस्कर होण्यास मदत होणार आहे.

महिला डॉक्टरांचा 'नवदुर्गा सन्मानपत्र' देऊन गौरव

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

बदलापूर प्रतिनिधी/गुरुनाथ तिरपणकर : 'रुग्णसेवा हीच ईश्वरसेवा' या उदात्त भावनेतून रुग्णांना आरोग्यसेवा देण्यासाठी अहोरात्र तत्पर असणाऱ्या महिला डॉक्टरांच्या कार्याचा गौरव करत जनजागृती सेवा संस्थेच्या वतीने 'नवदुर्गा सन्मानपत्र' प्रदान करून त्यांचा यथोचित सन्मान करण्यात आला. नुकत्याच संपन्न झालेल्या नवरात्रोत्सवाचे औचित्य साधून बदलापूर येथील आरोग्य आयुष्मान भारत दवाखान्यात हा प्रेरणादायी उपक्रम उत्साहात पार पडला.

महाराष्ट्र शासनाच्या आरोग्य विभागांतर्गत कार्यरत वैद्यकीय अधिकारी डॉ. केतकी गायकवाड, डॉ. प्रियांका राठोड, डॉ. प्रगती भेरे आणि डॉ. हर्षदा बिऱ्हाडे यांना आकर्षक भेटवस्तू, पेन, गुलाबपुष्प आणि 'नवदुर्गा सन्मानपत्र' प्रदान करून गौरविण्यात आले. जनजागृती सेवा संस्थेचे ज्येष्ठ सल्लागार, समता साहित्य अकादमी महाराष्ट्राचे अध्यक्ष तथा राष्ट्रपती पदक सन्मानित दिलीप नारकर यांच्या हस्ते हा सन्मान समारंभपूर्वक प्रदान करण्यात आला. स्पर्श हॉस्पिटल, बदलापूर-कर्जत-पनवेल महामार्ग परिसरातील आरोग्य आयुष्मान भारत दवाखान्यात या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी बोलताना दिलीप नारकर म्हणाले, डॉक्टर हा केवळ एक व्यवसाय नसून तो माणुसकीची सेवा करण्याचा पवित्र धर्म आहे. रुग्णाच्या वेदना समजून घेणे, त्याला योग्य उपचार देणे आणि त्याच्या मनात जगण्याची नवी उमेद निर्माण करणे, ही डॉक्टरांच्या कार्याची खरी महती आहे. विशेषतः महिला डॉक्टर घर, कुटुंब आणि व्यावसायिक जबाबदाऱ्या समर्थपणे सांभाळत आरोग्यसेवेच्या क्षेत्रात मोलाचे योगदान देत आहेत. अनेकदा प्रतिकूल परिस्थितीतही त्या रुग्णांच्या सेवेसाठी तत्पर असतात. त्यांच्या ज्ञानाला करुणेची जोड आणि कर्तव्याला सेवाभावाची किनार लाभलेली असते. अशा सेवाव्रती डॉक्टरांचा सन्मान करणे म्हणजे समाजातील सेवाभावी वृत्तीचा गौरव करणे होय. नवरात्रोत्सवातील नवदुर्गांच्या प्रेरणेतून या महिला डॉक्टरांच्या कार्याचा गौरव होत आहे, ही आनंदाची आणि अभिमानाची बाब आहे. त्यांच्या हातून अशीच निरंतर रुग्णसेवा घडत राहो आणि त्यांना पुढील वाटचालीसाठी उत्तम आरोग्य, यश व समाधान लाभो, अशा शब्दांत त्यांनी डॉक्टरांच्या कार्याचे कौतुक करून शुभेच्छा दिल्या.

जनजागृती सेवा संस्थेचा स्तुत्य उपक्रम; रुग्णसेवेतील समर्पणाचा केला सन्मान

अध्यक्ष गुरुनाथ तिरपणकर यांनी उपस्थित वैद्यकीय अधिकाऱ्यांना जनजागृती सेवा संस्थेच्या सामाजिक, शैक्षणिक आणि जनहिताच्या कार्याची सविस्तर माहिती दिली. समाजातील विविध क्षेत्रांत निःस्वार्थपणे कार्य करणाऱ्या व्यक्तींच्या योगदानाची दखल घेऊन त्यांना प्रोत्साहन देणे, हा संस्थेच्या उपक्रमांचा प्रमुख उद्देश असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

नरोगी समाजाच्या निर्मितीसाठी डॉक्टरांचे योगदान अनमोल आहे. रुग्णांना केवळ औषधोपचारच नव्हे, तर मानसिक आधार आणि विश्वास देणाऱ्या डॉक्टरांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याच्या उद्देशाने 'नवदुर्गा सन्मानपत्र' उपक्रम राबविण्यात आला. आरोग्यसेवेच्या माध्यमातून समाजाप्रती आपले कर्तव्य निष्ठेने पार पाडणाऱ्या महिला डॉक्टरांचा सन्मान हा त्यांच्या कार्याला नवी प्रेरणा देणारा ठरला.

रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय सचिव सुरेश बारसिंग यांचे दुःखद निधन

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

मुंबई : रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय सचिव तथा ठाणे-पालघर जिल्हा प्रभारी सुरेश बारसिंग यांचे आज चेंबूर येथील रुग्णालयात अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले.

जीवाभावाचा पँथर मित्र हरपला – केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले

दलित पँथर चळवळीपासून माझ्यासोबत सावलीसारखे राहून आंबेडकरी चळवळीला आणि रिपब्लिकन पक्षाला बळ देणारा जीवाभावाचा पँथर मित्र हरपला आहे, अशा शब्दांत केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री तथा रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष ना. रामदास आठवले यांनी श्रद्धांजली वाहिली.

सुरेश बारसिंग यांच्या निधनाने रिपब्लिकन व आंबेडकरी चळवळीची मोठी हानी झाली असून, त्यांच्या कार्याच्या आणि आठवणींचे सदैव स्मरण राहील.

अंत्यसंस्कार : ३० ऑक्टोबर, सकाळी ११ वाजता, चैत्यभूमी, दादर स्मशानभूमी.

भावपूर्ण श्रद्धांजली!

कळंब येथील संकल्प क्लबच्या मुलींनी राष्ट्रीय हॉलीबॉल स्पर्धेत पटकावले सुवर्णपदक

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

कळंब/प्रतिनिधी : स्टुडंट ऑलिंपिक असोसिएशनने हरियाणा रोहतक विद्यापीठामध्ये घेतलेल्या राष्ट्रीय हॉलीबॉल स्पर्धेमध्ये कळंबच्या संकल्प हॉलीबॉल क्लबच्या मुलींनी १९ वर्ष वयोगटात प्रथम क्रमांक मिळवला.

कोल्हापूर येथे झालेल्या स्टुडंट ऑलिंपिक असोसिएशनच्या राज्यस्तरीय हॉलीबॉल स्पर्धेमध्ये या मुलींनी प्रथम क्रमांक पटकावल्यामुळे त्यांचा राष्ट्रीय स्पर्धेसाठी प्रवेश निश्चित झाला होता. राष्ट्रीय स्पर्धा हरियाणा रोहतक विद्यापीठामध्ये झाल्या. त्याच्यामध्ये कळंबच्या संकल्प हॉलीबॉल क्लबच्या मुलींनी १९ वर्ष वयोगटात सेमी फायनलला मणिपूरच्या संघाला व फायनलला हरियाणाच्या संघाला हरवून बाजी मारत प्रथम क्रमांक पटकावला आणि सुवर्णपदक प्राप्त केले.

या संघामध्ये तन्वी टोपे, साक्षी काळे, सारिका कांबळे, सृष्टी टोपे, प्रीती कवडे, माहेश्वरी जमादार, स्नेहा थोरबोले, आकांक्षा पंडित आणि प्रतीक्षा गायकवाड यांनी उत्तम कामगिरी केली.

या यशाबद्दल संकल्पचे प्रशिक्षक रतन उबाळे, विद्याताई काळे व सर्व संघाच्या मुलींचे कौतुक होत आहे. १२ ते १५ जानेवारीमध्ये हा संघ आंतरराष्ट्रीय स्पर्धा खेळण्यासाठी मालदीवला जाणार आहे.

अक्कलकोटला स्वामी समर्थांच्या चरणी साखर अर्पण

कार्यकारी संचालक सुयोग गायकवाड यांचा देवस्थानच्या वतीने सन्मान

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

पंढरपूर : कंचेश्वर शुगर लिमिटेड, उत्पादित झालेली साखर श्री अक्कलकोट स्वामी समर्थ महाराजांच्या पवित्र चरणी अर्पण करण्यात आली. सिताराम महाराज साखर कारखाना (खर्डी) लिमिटेड, आष्टी शुगर आणि कंचेश्वर शुगर या संस्थांचे कार्यकारी संचालक सुयोग जी गायकवाड (भैय्यासाहेब) यांनी साखर अर्पण करून स्वामी समर्थ महाराजांचे दर्शन घेतले.

यावेळी देवस्थानचे ट्रस्टी अमोल राजे भोसले यांच्या हस्ते मंदिर समितीच्या वतीने श्री गायकवाड यांचा यथोचित सन्मान करण्यात आला.

समर्थ महाराजां प्रीती असलेली श्रद्धा आणि भक्ती भाऊ व्यक्त करण्याच्या उद्देशाने हा धार्मिक सोहळा पार पडला. साखर अर्पण करून दर्शन घेतल्यावर गायकवाड यांनी कारखाना परिवार, ऊस उत्पादक शेतकरी, अधिकारी कर्मचारी आणि हितचिंतकाच्या सुख-समृद्धीसाठी पार्थना केली.

समर्थ महाराजांची कृपादृष्टी सर्वांवर सदैव राहो, सर्वांना उत्तम आरोग्य, सुख, समृद्धी ,आणि हे शिलाभो अशी भावना यावेळी त्यांनी व्यक्त करण्यात आली.

ऑल इंडिया रेल्वे फेडरेशनचे सरचिटणीस मिश्रा यांचा इशारा

मागण्या मान्य न झाल्यास रेल्वे कर्मचारी व सरकारचा संघर्ष निश्चित

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

पंढरपूर : आज देशभरात रेल्वे विभागात अडीच लाख पदे रिक्त असून याची भरती करणे तसेच विविध प्रश्न केंद्र सरकारने सरळ मार्गाने मान्य केले नाहीत तर आम्हाला सरकार विरोधात मोठा संघर्ष निश्चित करावा लागेल असा इशारा ऑल इंडिया रेल्वेमेन्स फेडरेशनचे सरचिटणीस गोपाल मिश्रा यांनी पंढरपूर येथे दिला.

नॅशनल रेल्वे मजदूर युनियनच्या मध्य रेल्वे व कोकण रेल्वेचे ७२ वे अधिवेशन पंढरपूर येथील रेल्वे स्थानकामध्ये आयोजित करण्यात आले आहे. दि.२७ ते २९ ऑक्टोबर रोजी पार पडणाऱ्या या अधिवेशनास जवळपास पाच हजार रेल्वे कर्मचारी उपस्थित आहेत. सदर अधिवेशनाचे उद्घाटन झाल्यानंतर गोपाल मिश्रा यांनी पत्रकारांशी संवाद साधला. यावेळी मध्य व कोकण रेल्वे विभाग संघटनेचे सरचिटणीस वेणू पी.नायर, जी.आर.भोसले उपस्थित होते.

यावेळी बोलताना मिश्रा यांनी, रेल्वेची सर्वात मोठी समस्या म्हणजे अडीच लाख कर्मचाऱ्यांची पद रिक्त आहेत. खुद्द रेल्वे मंत्र्यांनी ही माहिती जाहीर केली आहे. दरवर्षी मोठ्या संख्येने कर्मचारी सेवानिवृत्त होत आहेत, परंतु त्या प्रमाणात नोकर भरती होत नाही. आज देशात, महाराष्ट्रात बेरोजगार युवकांची संख्या मोठ्या प्रमाणात असताना देखील नोकरी भरती केली जात नसल्याने त्यांनी आश्चर्य व्यक्त केले. या बाबत आम्ही सरकारला वारंवार मागणी करत आहोत. यासह बाह्यस्त्रोतांकडून अर्थात आउटसोर्सिंग व्दारे कामगार भरती होत आहे. यास देखील आमचा कडाकडून विरोध आहे. नवीन भरती नाही तर दुसरीकडे निवृत्त झाल्यानंतर पुन्हा ६० व्या वर्षी कर्मचाऱ्यांना दोन वर्षासाठी कामावर घेण्यात येत आहे. यास देखील आमचा विरोध असल्याचे मिश्रा यांनी सांगितले. यासह आठवा वेतन आयोग, कामाचे तास, जादा कामाचे वेतन न मिळणे आदी विविध प्रश्न असून यावर तीन दिवस मंथन होणार आहे. या नंतर डिसेंबर महिन्यात विजयवाडा येथे अधिवेशन होणार असून याव्दारे सरकारला आमच्या मागण्यांचे निवेदन दिले जाणार आहे. सरकारने वेळेत मागण्या मान्य केल्यास आम्हास मोठा संघर्ष करावा लागेल हे निश्चित असा इशारा दिला.

१९७४ चा इतिहास विसरू नका

यावेळी बोलताना वेणू पी.नायर यांनी, पूर्वी ११ हजार रेल्वे होत्या आणि १५ लाखाहून अधिक कर्मचारी कार्यरत होते. परंतु आता १३ लाखाहून अधिक रेल्वे दिवसभरात कोट्यवधी प्रवाश्यांची वाहतूक करतात. प्रवासी संख्या वाढली, काम वाढले मात्र कर्मचाऱ्यांची संख्या केवळ १२ लाखच आहे. याचा सरकारने विचार करणे गरजेचे आहे. मागण्यांसाठी रेल्वे बंद करण्यावर आमचा विश्वास नाही. संवाद साधण्यावर आम्ही भर देऊ परंतु सरकार आमच्याकडे दुर्लक्ष करणार असेल तर १९७४ साली देशभरातील १७ लाख रेल्वे कर्मचाऱ्यांनी २० दिवस केलेल्या आंदोलनाचा इतिहास थोडा आठवून बघा असा इशारा दिला.

सिटी लिंक बसच्या धडकेत खेडलेझुंगेच्या तरुणाचा मृत्यू

शिंपीटाकळी फाट्याजवळ अपघात; बसचालकाविरुद्ध गुन्हा दाखल

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

निफाड/प्रतिनिधी : नाशिकहून खेडलेझुंगेकडे मोटारसायकलवरून जात असताना सिटी लिंक बसने पाठीमागून जोरदार धडक दिल्याने झालेल्या अपघातात किरण कैलास गिते (वय २८, रा. खेडलेझुंगे) यांचा दुर्दैवी मृत्यू झाला. हा अपघात दि. २६ ऑक्टोबर रोजी रात्री साडेदहाच्या सुमारास निफाड तालुक्यातील छत्रपती संभाजीनगर महामार्गावरील शिंपीटाकळी फाट्याजवळ घडला. याप्रकरणी सायखेडा पोलिस ठाण्यात संबंधित बसचालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. लिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, किरण गिते हे २६ ऑक्टोबर रोजी रात्री नाशिकहून मोटारसायकलने (क्र.एम.एच १५ के.एफ ४०३५) खेडलेझुंगे येथे घरी जात होते. शिंपीटाकळी फाटा परिसरातील माऊली हॉस्पिटलजवळ ते स्पीडब्रेकरवरून जात असताना पाठीमागून आलेल्या सिटी लिंक बसने (क्र.एम.एच १५ जी.व्ही ७९९३) त्यांच्या मोटारसायकलला जोरदार धडक दिली. या धडकेत किरण गिते गंभीर जखमी झाले. त्यांना तातडीने उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले; मात्र उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला. या प्रकरणी संदीप माधव गिते यांनी दिलेल्या फिर्यादीवरून सायखेडा पोलिस ठाण्यात बसचालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या अपघाताचा पुढील तपास सायखेडा पोलिस करीत आहेत.

दुष्काळाच्या झळा सोसणाऱ्या शेतकऱ्यांना दिलासा ; १० नोव्हेंबरला शेतीसाठी पाणी सोडण्याचे निर्देश

आमदार डॉ. बाबासाहेब देशमुख यांच्या मागणीला मंत्रिमहोदयांचा प्रतिसाद

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

सांगोला (प्रतिनिधी) : भयाण दुष्काळी परिस्थितीचा सामना करणाऱ्या सांगोला तालुक्यातील शेतकऱ्यांना शेतीसाठी पाणी मिळावे, यासाठी आमदार डॉ. बाबासाहेब देशमुख सातत्याने प्रयत्नशील आ-हेत. रब्बी हंगामातील शेतीसाठीचे पूर्ण पाणी आवर्तन सोडावे, तसेच सोनके व चिंचोली तलाव भरून द्यावेत, अशी मागणी त्यांनी जलसंपदामंत्री नामदार राधाकृष्ण विखे पाटील यांच्याकडे केली होती. या मागणीला प्रतिसाद देत मंत्रिमहोदयांनी १० नोव्हेंबर रोजी पाणी सोडण्याचे निर्देश दिले आ-हेत. त्यामुळे दुष्काळाच्या झळा सोसणाऱ्या शेतकऱ्यांना दिलासा मि ळण्याची आशा निर्माण झाली आहे.

नीरा उजवा कालव्याच्या पाणी नियोजनासंदर्भात जलसंपदामंत्री नाम दार राधाकृष्ण विखे पाटील यांच्या उपस्थितीत झालेल्या नियोजन बैठकीत आमदार डॉ. बाबासाहेब देशमुख यांनी खरीप हंगामातील ढिसाळ पाणी नियोजनावरून संबंधित अधिकाऱ्यांना धारेवर धरले. दुष्काळी सांगोला तालुक्यात शेतीसाठी पाण्याची उप-लब्धता हा अत्यंत जिव्हाळ्याचा प्रश्न

नीरा उजवा कालव्याच्या पाणी नियोजन बैठकीत आमदार डॉ. बाबासाहेब देशमुख यांनी अधिकाऱ्यांना धरले धारेवर; सोनके व चिंचोली तलाव भरून देण्याची मागणी

असून, पाणी नियोजनातील त्रुटींमुळे शेतकऱ्यांचे नुकसान होऊ नये, यासाठी अधिकाऱ्यांनी गांभीर्याने काम करण्याची गरज त्यांनी व्यक्त केली.

सांगोला तालुक्यात यंदा भयाण दुष्काळी परिस्थिती निर्माण झाली असून, शेतकऱ्यांना शेती टिकविण्यासाठी पाण्याची नितांत गरज आहे. अशा परिस्थितीत रब्बी हंगामासाठी वेळेत आणि पूर्ण आवर्तन मिळणे आवश्यक आहे. त्यामुळे रब्बी हंगामातील शेतीसाठीचे पूर्ण पाणी आवर्तन सोडण्याची मागणी आमदार डॉ. बाबासाहेब देशमुख यांनी केली. त्याचबरोबर सोनके व चिंचोली तलाव भरून देण्याची मागणीही त्यांनी बैठकीत ठामपणे मांडली.

दुष्काळी परिस्थितीत शेतकऱ्यांना पाण्याविना अडचणीत राहावे लागू नये, यासाठी आमदार डॉ. बाबासाहेब देशमुख यांनी जलसंपदामंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्याकडे रब्बी हंगाम ातील शेतीसाठीचे पूर्ण पाणी आवर्तन सोडण्याबाबत पाठपुरावा केला होता. त्यांच्या मागणीची दखल घेत नामदार राधाकृष्ण विखे पाटील यांनी १० नोव्हेंबर रोजी पाणी सोडण्याचे निर्देश दिले. त्यामुळे रब्बी हंगाम ातील शेतीच्या पाण्याचा प्रश्न मार्गी लागण्याच्या दृष्टीने महत्त्वाचे पाऊल पडले आहे.

त्याचबरोबर सोनके व चिंचोली तलाव भरून देण्याच्या आमदार डॉ. बाबासाहेब देशमुख यांच्या मागणीम ुळे या तलावांवर अवलंबून असलेल्या शेतकऱ्यांच्या आशा उंचावल्या आ-हेत. दरम्यान, सोनके तलाव व चिं-चोली तलावामध्ये शेतीसाठी पुढील पाणी आवर्तन १० नोव्हेंबर रोजी देण्यात येणार असल्याचे बैठकीत सांगण्यात आले.

दुष्काळी भागातील शेतीला पाण्याचा आधार मिळावा आणि उपलब्ध पाण्याचा लाभ शेतकऱ्यांना व्हावा, यासाठी या मागण्यांची अंम लबजावणी महत्त्वाची ठरणार आहे.

सांगोला तालुक्यातील शेतकऱ्यांना शेतीसाठी पाणी मि ळावे, सिंचनाचे प्रश्न मार्गी लागा-वेत आणि दुष्काळी परिस्थितीत त्यांना दिलासा मिळावा, यासाठी आमदार डॉ. बाबासाहेब देशमुख सातत्याने शासनदरबारी आवाज उठवत आहेत. पाणी नियोजनातील त्रुटी, पूर्ण आवर्तनाची आवश्यकता आणि तलावांमध्ये पाणी उप-लब्ध करून देण्यासारख्या प्रश्नांवर ते संबंधित मंत्री व अधिकाऱ्यांकडे पाठपुरावा करत आहेत. नीरा उजवा कालव्याच्या नियोजन बैठकीतही

टेंभू–म्हैसाळ योजनेचे आवर्तन १५ डिसेंबर पर्यंत सोडणार!

सांगोला तालुक्यातील शेतकऱ्यांना दुष्काळी परिस्थितीत शेतीसाठी पाणी मिळावे, यासाठी आमदार डॉ. बाबासाहेब देशमुख यांनी केलेल्या मागणीची दखल घेत जलसंपदामंत्री नामदार राधाकृष्ण विखे पाटील यांनी टेंभू–म्हैसाळ योजनेचे आवर्तन १५ डिसेंबर पर्यंत सोडण्याचे निर्दे श दिले आहेत. नीरा उजवा कालव्याच्या पाण्याबरोबरच टेंभू–म्हैसाळ योजनेच्या आवर्तनासाठीही आमदार डॉ.बाबासाहेब देशमुख यांनी पाठपुरावा केल्याने शेतकऱ्यांना दिलासा मिळण्याची अपेक्षा आहे.

त्यांनी शेतकऱ्यांच्या प्रश्नांना प्राधान्य देत अधिकाऱ्यांना जाब विचारला.

दरम्यान, पाणी वितरण करताना कोणताही शेतकरी वंचित राहणार नाही, याची दक्षता घेण्याच्या सूचना जलसंपदामंत्री नामदार राधाकृष्ण विखे पाटील यांनी उपस्थित अधिकाऱ्यांना दिल्या. नियोजनानुसार शेतकऱ्यांना पाणी मिळावे, यासाठी आवश्यक कार्यवाही करण्याचे निर्देशही त्यांनी दिले.

भयाण दुष्काळी परिस्थितीत रब्बी हंगामातील शेतीसाठीचे पूर्ण पाणी आवर्तन सोडण्याच्या आमदार डॉ. बाबासाहेब देशमुख यांच्या मागणीला नामदार विखे पाटील यांच्याकडून प्रतिसाद मिळाल्याने सांगोला तालुक्यातील शेतकऱ्यांना दिलासा मिळण्याची अपेक्षा आहे. रब्बी हंगामासाठी पाणी आवर्तनाच्या मागणीमुळे शेतकऱ्यांमध्ये आशादायी वातावरण निर्माण झाले असून, आम दार डॉ. बाबासाहेब देशमुख यांच्या पाठपुराव्याचे कौतुक होत आहे.

अक्कलकोटचे गटशिक्षणाधिकारी प्रशांत आरबाळे चौकशीला हाजीर हो..!

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

सोलापूर : अक्कलकोट पंचायत समितीचे प्रभारी गटशिक्षणाधिकारी प्रशांत आरबळे यांच्याविरोधात करण्यात आलेल्या तक्रारीची दखल घेत अखेर शिक्षण विभाग, जिल्हा परिषद, सोलापूर यांनी चौकशीचे आदेश दिले आहेत. चौकशीसाठी आज दि. २९/१०/२०२६ रोजी दुपारी ३.०० वाजता शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जि.प. सोलापूर यांच्या निजी कक्षात उप-स्थित राहण्याचे पत्र देण्यात आले आहे.

काय आहे प्रकरण ?

महाराष्ट्र राज्य कामगार सुरक्षा दल, सोलापूरचे राज्य उपाध्यक्ष राजाभाऊ चंद्रभा बेलेनेवरु यांनी दि. ३/९/२०२६ रोजी जिल्हाधिकारी सोलापूर, मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद सोलापूर, मा. शिक्षणाधिकारी (प्राथ) जि.प. सोलापूर यांना लेखी निवेदन दिले होते.

त्या निवेदनात त्यांनी प्रशांत असबाळे यांच्यावर आरोप केले आहेत की –

१) अक्कलकोट तालुक्यात गटशिक्षणाधिकारी म्हणून कार्यरत असताना त्यांनी केलेल्या अनेक भ्रष्टाचारासंदर्भात वृत्तपत्राद्वारे बातम्या प्रसिद्ध झाल्या आहेत.

२) गैरमार्गाने आर्थिक व्यवहारातून कमविलेल्या मायेतून त्यांच्या पत्नी भाग्यश्री प्रशांत आरबळे यांच्या नावे मौजे बागेहळ्ळी ता. अक्कलकोट येथील गट क्रमांक ४६/१/३/१/१ एकूण क्षेत्र ० हेक्टर ३८ आर इतकी जमीन घेतलेली आहे, असा आरोप आहे.

३) त्यांच्या पत्नीस आर्थिक व्यवहार करून के.एल.ई. संचालित मंगरुळे शिक्षण संस्थेत शिक्षक या पदावर शिक्षिका म्हणून नोकरीस लावलेले आहे, असा आरोप आहे.

यावरून असबाळे यांची उइ (लाचलुचपत प्रतिबंधक विभाग) खात्यामार्फत गैरमार्गाने कमावलेल्या मालमत्तेची व पत्नीस नोकरी लावल्याबाबतची व इतरत्र घेतलेल्या मालमत्तेची सखोल चौकशी होऊन त्यांच्यावर कठोर कारवाई व्हावी, अशी मागणी करण्यात आली होती. या म ागणीसाठी दि. ०१/०९/२०२६ रोजी सकाळी १० वाजल्यापासून पुनम गेट जिल्हा परिषद सोला-पूर येथे अन्नत्याग बेमुदत आमरण उपोषण करणार असल्याचा इश-ाराही देण्यात आला होता.

हे निवेदन प्रत कार्यवाहीस्तव महाराष्ट्र लाच लुचपत प्रतिबंधक ब्युरो मुंबई, लाच लुचपत अधिकारी, सोलापूर, विभागीय अधिकारी (प्रांत) अक्कलकोट, गटविकास अधिकारी, पंचायत समिती अक्कलकोट, तहसिलदार अक्कलकोट यांना पाठविण्यात आले होते.

आता चौकशीला बोलावले –

या तक्रारीच्या अनुषंगाने शिक्षण विभाग, जिल्हा परिषद, सोलापूर यांनी जावक क्र. जिपसो/शिक्षण/कार्या–१/६६३/२६, सोलापूर दिनांक २८/१०/२०२६ रोजी पत्र काढले आहे.त्यात म्हटले आहे की, आपण प्रशांत असबाळे, प्रभारी गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती अक्कलकोट यांच्या विरुद्ध तक्रार अर्ज या कार्यालयाकडे प्राप्त झालेले आहे. त्या अनुषंगाने चौकशीकामी दि. २९/१०/२०२६ रोजी दुपारी ३.०० वाजता शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद सोल-ापूर यांच्या निजी कक्षात वेळेवर उपस्थित रहावे.

या पत्रावर (स्मिता नडीम ेतला), उपशिक्षणाधिकारी (प्राथमि क), जिल्हा परिषद, सोलापूर यांची स्वाक्षरी आहे.

आता चौकशीत काय निष्पन्न होते, याकडे अक्कलकोटसह संपूर्ण सोलापूर जिल्ह्यातील शिक्षण क्षेत्राचे लक्ष लागले आहे.

महत्त्वाची नोंद: वरील आरोप हे तक्रारदार राजाभाऊ बेलेनेवरु यांनी निवेदनात केलेले आरोप आहेत. याबाबत प्रशांत आरबळे यांची बाजू / खुलासा अद्याप समोर आलेला नाही. सोलापूर समाचार त्यांची बाजू मिळताच प्रसिद्ध करेल.

डोहोळे येथे लोकसहभागातून वनराई बंधाऱ्याची उभारणी; शेतकऱ्यांना दिलासा!

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

ठाणे प्रतिनिधी–मिलिंद जाधव

परतीच्या पावसाने दडी मारल्याने परिसरात पाणीटंचाईचे संकट निर्माण झाले आहे. नदी–नाले आटू लागल्याने शेतीसाठी पाणी उपलब्ध होणे कठीण झाले असून शेतकरी चिंतेत आहेत. अशा परिस्थितीत वासिंदजवळील डोहोळे ग्रामपंचायतीने पुढाकार घेत कर्मचारी आणि ग्रामस्थांच्या श्रम दानातून ओढ्यावर वनराई बंधारा बांधला आहे. या उपक्रमामुळे पाणी अडविण्यास मदत होत असून भाजीप-ाला उत्पादक शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळण्याची आशा निर्माण झाली आहे.

डोहोळे ग्रामपंचायतीचे ग्राम पंचायत अधिकारी परेश सोनवणे यांनी पाणीटंचाईची परिस्थिती लक्षात घेऊन ग्रामपंचायतीतील कर्मचारी आणि ग्रामस्थांना पाणी अडवा, पाणी जिरवा या उपक्रमात सहभागी होण्याचे आ-वाहन केले. त्यानुसार सर्वांनी एकत्र येत श्रमदानातून वनराई बंधाऱ्याची उभारणी केली. ग्रामपंचायतीच्या माध्यम ातून बंधाऱ्यासाठी गोण्यांची व्यवस्था करण्यात आली.

परतीच्या पावसाने पाठ फिरवल्याम ुळे रब्बी हंगामातील पिकांसाठी पाण्याची टंचाई जाणवण्याची शक्यता आहे. विशेषतः भाजीपाला उत्पादना-वर अवलंबून असलेल्या गरीब आणि कष्टकरी शेतकऱ्यांसमोर मोठे संकट उभे राहिले आहे. अनेक शेतकऱ्यांनी कर्ज काढून बियाणे, मशागत आणि लागवडीसाठी हजारो रुपये खर्च केले आहेत. मात्र, पाणी उपलब्ध न झाल्यास पिके वाया जाण्याची भीती त्यांना सता-वत आहे.

या पार्श्वभूमीवर वनराई बंधाऱ्यात पाणी साचू लागल्याने शेतीसाठी पाण्याची उपलब्धता वाढण्यास मदत होणार आहे. तसेच भूजल पातळी वाढविण्यास हातभार लागण्याची अपेक्षा आहे. भाजीपाला आणि इतर पिकांना पाणी मिळाल्यास शेतकऱ्यांचे संभाव्य नुकसान कमी होऊ शकते.

डोहोळे ग्रामपंचायतीने कर्मचारी आणि ग्रामस्थांच्या सहकार्याने राबविलेला हा उपक्रम जलसंधारण आणि लोकसहभागाचे महत्त्व अधोरेखित करणारा आहे. पाणीटंचाईच्या काळात अशा उपक्रमांमुळे स्थानिक पातळीवर जलसाठा निर्माण करण्यास मदत होते. त्यामुळे जलसंधारणासाठी ग्रामपंचायती आणि नागरिकांनी एकत्रितपणे पुढाकार घेण्याची गरज व्यक्त होत आहे.

जि. प. प्राथमिक शाळा तांदुळवाडी येथे कु. श्रीनिधी पौळचा वाढदिवस उत्साहात; वाढदिवसानिमित्त शाळेला ५०० लिटरची पाण्याची टाकी भेट!

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

कळंब (प्रतिनिधी): सुधाकर रणदिवे, कळंब तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा तांदुळवाडी येथील हुशार, गुणी, नम्र आणि अभ्यासू विद्यार्थिनी कु. श्रीनिधी संतोष पौळ हिचा वाढदिवस नुकताच शाळेमध्ये अत्यंत उत्साहात आणि आगळ्यावेगळ्या पद्धतीने साजरा करण्यात आला. या खास प्रसंगी तिच्या वडिलांनी सामाजिक बांधिलकी जोपासत शाळेला ५०० लिटरची पाण्याची टाकी भेट देऊन एक आदर्श निर्माण केला आहे.

शाळेच्या मूलभूत आणि किरकोळ गरजा समाज सहभागातून पूर्ण व्हाव्यात, यासाठी शाळेतील होतकरू व उपक्रमशील शिक्षिका श्रीमती आशा पवार मॅडम नेहमीच सतत प्रयत्नशील असतात. त्यांच्याच प्रेरणेतून आणि मार्गदर्शनाखाली आज शाळेला पाण्याची ही बहुमूल्य भेट मिळाली असून, शाळा प्रशासनाकडून त्यांचे विशेष कौतुक होत आहे.

वाढदिवसानिमित्त आयोजित या सत्कार व सभेच्या कार्यक्रमास शाळेतील सर्व विद्या-र्थी तसेच मुख्याध्यापक श्री. संतोष भोजने, संतोष मोहिते, सयाजी शिंदे,रसिका आगरकर आदी शिक्षकवृंद व ग्रामस्थ उपस्थित होते.

कु. श्रीनिधीच्या वाढदिवसानिमित्त तिच्यावर शैक्षणिक व कौतुकाचा वर्षाव होत असून, पौळ कुटुंबाच्या या समाजोपयोगी उपक्रमाचे सर्वत्र स्वागत होत आहे.

हैद्रा दर्ग्यात नैवेद्य स्वीकारण्यासाठी भाविकांची लुट

पवित्र श्रद्धास्थानावर पुजाऱ्यांची मग्रुरी; भक्तांचे चीड आणणारे वर्तन!

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

अक्कलकोट/प्रतिनिधी : अक्कलकोट तालुक्यातील हैद्रा येथील हिंदू–मुस्लिम भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या पवित्र 'ख्वाजा पिर सैफुल मुलख दर्ग्यात नैवेद्य स्वीकारण्यासाठी थेट भक्ताकडून दोन हजार घेऊन भक्तांची आर्थिक लूट केली जात आहे. नकार देणाऱ्या किंवा विचारणा करणाऱ्या भक्तांना दमदाटी आणि शिवीगाळ केली जात आहे.या प्रकारामुळे देशभरातून येणाऱ्या भाविकांम ध्ये तीव्र नाराजी आणि भीतीचे वातावरण पसरले आहे.

हैद्रा हे हिंदू–मुस्लिम सम ाजाचे पवित्र श्रद्धास्थान आहे, जिथे दोन्ही धर्मांचे भाविक अथांग श्रद्धेने येतात; परंतु काही मुजोर पुजाऱ्यांनी या स्थ-ानाला लुटीचा अड्डा बनवले आहे.भक्तांच्या श्रद्धेचा असा अपमान आणि उघड लूट पाहून भक्तांच्या संतापाचा बांध फ ुटला आहे.नुकत्याच घडलेल्या एका घटनेत, गुरुवारी पूजा स्वीकारण्यासाठी पुजाऱ्यांनी दोन हजार रुपयांची मागणी केली.दोन हजार कशासाठी अशी विचारणा केली असता, एका भक्तांना दमदाटी करण्यात आली.

येथे दर्शनासाठी गर्दी करणाऱ्या भाविकांच्या अडीअडचणी सोडवणे अपेक्षित असताना,उलट पुजाऱ्यांकडून आर्थिक लुट केली जात आहे.

पुजाऱ्यांकडून अवाजवी रक्कम उकळणे पूर्णपणे चुकीचे असून ते आम्हाला मुळीच मान्य नाही.आगामी ३ तारखेच्या बैठकीत देणगी स्वरूपात केवळ ५०० रुपये स्वीकारण्याचा अधिकृत निर्णय घेतला जाईल. निर्णय घेऊन जे कुणी मनमानी पद्धतीने वसुली करतील,त्यांच्यावर थेट फौजदारी गुन्हे दाखल केले जातील.

– एमडी रफीक शिराजोद्दीन मुजावर –चेअरमन, हैद्रा ट्रस्ट,अक्कलकोट

दोन हजार रुपये द्या तरच पूजा स्वीकारू,अन्यथा नाही;हा अजब कारभार हैद्रा दर्ग्यात सुरू आहे.ज्याला तक्रार करायची करा,आम्हाला कोणाचीही भीती वाटत नाही,हा आमचा मालकी हक्क आहे,अशी अरेरावीची भाषा पुजाऱ्यांकडून वापरली जात असल्याचे भक्तांचे म्हणणे आहे.या मनमानी कारभाराबाबत संबंधित ट्रस्टच्या अध्यक्षांकडे तक्रार करूनही कोणतीही ठोस पावले उचलली गेलेली नाहीत. दूरवरून येणाऱ्या भाविकांना स्थानिक पातळीवर तक्रार करणे कठीण होते.तक्रार करण्याचा प्रयत्न केल्यास स्थानिकांचा घोळका अंगावर धावून जातो आणि शारीरिक तसेच मानसिक त्रास दिला जातो,असा आरोपी भक्तांनी केला आहे.

या दर्ग्याच्या परिसरात सुरू असलेल्या बांधकाम आणि पुजाऱ्यांचा काहीही संबंध नसताना बांधकाम च्या नाव-ाने मोठी लुट केली जात आहे. सध्या या ठिकाणी शासनाचा निधी,वर्गणी आणि ट्रस्टीच्या स्वखर्चातून सुरू आहे.तरीही पुजाऱ्यांकडून बांधकामच्या नावाखालीही गैरप्रकार सुरू

दूरवरून आलेल्या भाविकांना लुटण्याचे केंद्र बनलेल्या पुजाऱ्यांनी पूजेसाठी तब्बल दोन हजार रुपये उकळले. विन-वणी धुडकावून नैवेद्य बळकावला आणि पावती मागताच शिवीगाळ व दमदाटी केली.भक्तांच्या श्रद्धेचा असा बाजार मांडणाऱ्या आणि गुंडगिरी करणाऱ्या या मुजोर पुजाऱ्यांवर प्रशासनाने तातडीने कठोर फौजदारी गुन्हे दाखल करून त्यांची हकालपट्टी करावी!

– अंबादास राठोड भक्त, जेऊरवाडी, ता. अक्कलकोट

करून भक्तांची लूट केली जात आहे.या पवित्र धार्मिक स्थळांवर सुरू असलेल्या अशा प्रकारच्या मुजोरीमुळे भाविकांच्या श्रद्धेचा खेळखंडोबा होत आहे.या प्रकरणाची तातडीने चौकशी करून दोषी पुजाऱ्यांवर कायदेशीर कारवाई करावी,अशी मागणी त्रस्त भक्तांकडून केली जात आहे.

हैद्रा हे हिंदू–मुस्लिम सम ाजाचे पवित्र श्रद्धास्थान आहे, जिथे दोन्ही धर्मांचे भाविक अथांग श्रद्धेने येतात; परंतु काही मुजोर पुजाऱ्यांनी या स्थानाला लुटीचा अड्डा बनवले आहे. आमच्या श्रद्धेचा असा अपमान आणि उघड लूट पाहून भक्तांच्या संतापाचा बांध फुटला आहे. दोन्ही समाजांच्या भावनांशी खेळणाऱ्या या लुटारूंवर कठोर कारवाई करा!